# संविधान ज्ञान परीक्षा

**विद्यार्थ्याचे नाव - ---------------------------------------------------------------------------------- इयत्ता - ----------------------**
**शाळेचे नाव - ----------------------------------------------------------------------------------- विभाग - ---------------------**

**(प्रत्येक प्रश्न 2 गुणांना असेल.)**

**प्रश्न 1 - भारताचा सर्वोच्च कायदा कोणता?**
1. कामगार कायदा 2. संचार कायदा 3. भारतीय संविधान 4. महिला कायदा

**प्रश्न 2 - भारत देशाचे खरे मालक कोण?**
1. पंतप्रधान व इतर मंत्री 2. राष्ट्रपती 3. मुख्यमंत्री आणि इतर मंत्री 4. देशातील लोक

**प्रश्न 3 - धर्मनिरपेक्षता म्हणजे काय?**
1. प्रत्येकाला पसंतीचा धर्म स्वीकारण्याचा अधिकार. 2. देशाचा कोणताही धर्म नसेल.
3. सरकार सर्व धर्मांना समान मानेल. 4. वरील सर्व बरोबर

**प्रश्न 4 - प्रौढ नागरिकांना आणि महिलांना मतदानाचा हक्क देणारा भारत कितवा देश आहे?**
1. चौथा 2.पहिला 3. आठवा 4. दुसरा

**प्रश्न 5 - लोकशाही कशाला म्हणतात?**
1. मंत्र्यांच्या हातात सर्व सत्ता असणे 2. एकाच माणसाच्या हातात सगळी सत्ता असणे
3. लोकांनी निवडून दिलेल्या लोकांनी शासन करणे. 4. राजाची मुले सत्तेवर येणे.

**प्रश्न 6 - संविधान कोणास अर्पण केलेले आहे?**
1. भारतीयांनी स्वतःला 2. महात्मा गांधीजींना 3. ईश्वराला 4. सरकारला

**प्रश्न 7 - आरक्षण कशासाठी आहे?**
1. दुसऱ्यांचा हक्क काढून घेण्यासाठी 2. सर्वांना समान पातळीवर आणण्यासाठी
3. लोकांमध्ये भेदभाव करण्यासाठी 4. एखाद्यालाच संधी देण्यासाठी

**प्रश्न 8 - संविधानाने आपल्याला कोणकोणते स्वातंत्र्य दिले?**
A. पसंतीचा धर्म स्वीकारण्याचे स्वातंत्र्य B. आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य
C. देशभरामध्ये कुठेही जाऊन राहण्याचे स्वातंत्र्य. D. काम करण्याचे स्वातंत्र्य.
1. फक्त A व B बरोबर 2. फक्त C बरोबर 3. सर्व पर्याय चूक 4. सर्व पर्याय बरोबर

**प्रश्न 9 - बंधुता म्हणजे काय?**
1. दुसऱ्याला छोटा भाऊ-बहिण समजणे 2. एकमेकांशी हळूहळू भांडण करणे
3. एकमेकांचा भावंडांप्रमाणे सांभाळ करणे 4. एकमेकांच्या वस्तू वापरणे

**प्रश्न 10 - गावातील वाचनालय फक्त एका विशिष्ट गटासाठी खुले आहे. काही विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन त्या वाचनालयाला सर्वांसाठी खुले करण्याची मागणी केली. त्यांचा हा निर्णय योग्य आहे का? का?**
1.योग्य आहे, कारण सार्वजनिक संसाधने सर्वांसाठी असावीत.
2.योग्य नाही, कारण प्रत्येक गटाचे स्वतःचे ठिकाण असावे.
3.योग्य आहे, पण फक्त विद्यार्थी याचा वापर करू शकतात.
4.योग्य नाही, कारण नियम बदलणे अवघड आहे.

**प्रश्न 11 - भारत ही कोणाची जबाबदारी आहे?**
1. फक्त माझी 2. सामूहिक जबाबदारी 3. फक्त सरकारची 4. फक्त श्रीमंत लोकांची

**प्रश्न 12 - कोणत्याही धर्माच्या सणाला तुमच्या मित्राला शुभेच्छा देणे कोणते संविधानिक तत्त्व मांडते?**
1.सहिष्णुता 2. धर्मनिरपेक्षता आणि बंधुता 3. सांस्कृतिक विविधता 4. व्यक्तिगत स्वातंत्र्य

**प्रश्न 13 – आर्थिक न्यायानुसार -------------------------------------------------------------**

1. कुणीही प्रचंड पैसा कमावू शकतो.
2. पैशाची नासधूस करू नये.
3. ज्याचे नशीब चांगले त्याला पैसा मिळेल.
4. पैशांचा साठा काहीच लोकांच्या हातात होवू नये.

**प्रश्न 14 - वर्गातील मॉनिटर म्हणून, कमी ऐकू येणाऱ्या मुलाला पुढच्या बाकावर बसवण्याचा तुमचा निर्णय कोणत्या संविधानिक मूल्याला मानतो?**

1.केवळ अनुकंपा 2. शिक्षणाचा अधिकार 3. सामाजिक न्याय आणि समानता 4. आरक्षणाचा फायदा

**प्रश्न 15 - आपण २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून का साजरा करतो ?**

1. त्या दिवशी भारत स्वतंत्र झाला.
2. देशाचा कारभार भारतीय संविधानानुसार सुरु झाला.
3. महात्मा गांधी यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करतो.
4. इंग्रज आपला देश सोडून पळून गेले.

**प्रश्न 16 - संविधानाने कामगार वर्गासाठी कोणते सुविधा अधिकार दिले आहेत?**

1.संघटना बनविण्याचा अधिकार
2. निवृत्तीनंतर पेन्शन मिळवण्याचा अधिकार
3.कामाचे तास जास्तीत जास्त 8 तास असण्याचा अधिकार
4. वरील सर्व

**प्रश्न 17 - स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, महानगरपालिका) का स्थापन केल्या?**

1.लोकांचा छळ होवू नये म्हणून
2. शेतकऱ्यांचे कल्याण व्हावे म्हणून
3. लोकांना सत्तेत सामील होता यावे म्हणून
4. जनतेला कर्ज मिळावे म्हणून

**प्रश्न 18 - पुरुषांना महिलांपेक्षा जास्त वेतन दिले जाते. हे संविधानाच्या कोणत्या तत्त्वाच्या विरोधात आहे?**

1.महिलांना उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग 2. आर्थिक न्याय 3. महिलांचे स्वातंत्र्य 4. सामाजिक न्याय

**प्रश्न 19 व 20 – चूक की बरोबर लिहा.**

19.भारतीय संविधानात प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही धर्माचे पालन न करण्याचा हक्क आहे. ----------------------

20. संविधानानुसार प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाचे रक्षण हे त्याचे कर्तव्य आहे. ----------------------

**21. संविधानाने शेतकऱ्यांसाठी काय केले?**

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**22. संविधानामुळे गरिबांना काय काय मिळाले आहे?**

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**23. संविधान नसते तर काय झाले असते?**

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**24. भारतीय संविधानातील मूल्ये कुठून आली आहेत?**

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**25. आपण एकमेकांशी बंधुतेने वागण्याचे एखादे उदाहरण सांगा.**

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------